| MHJN020001462026 | नि.दि.दा. क्र. ३४/२०२६<br>तुकाराम वि. महाराष्ट्र शासन व इतर |
|---|---|

## निशाणी ११ वरील आदेश

वादी यांनी प्रस्तुत अर्ज "जैसे थे'' परिस्थिती कायम ठेवणे बाबत दाखल केला आहे.

०२. वादीचे थोडक्यात कथन असे की, वादी यांची मौजे. पाथ्रुड ता.जि. जालना येथील शेत जमीन गट क्र. ४०९ या क्षेत्रात व प्रतिवादींना कोणताही हक्क संबंध नसल्याने मालकी व ताब्यात संबंध नाही. त्यांच्या जमीनीतुन पुर्वापार कोणताही रस्ता नाही असे असताना प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादींच्या जमीनीतुन जाण्यासाठी हरकत अडथळा दुर करून रहदारीसाठी रस्ता खुला करून द्यावा असा आदेश केला आहे. परंतु, आदेशाविरूद्ध प्रस्तुत दावा व अंतरिम मनाई हुकुम मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. वास्तविक पाहता अर्जदार यांच्या मालकी व ताब्यातील गट क्र. ४०९ मधुन कोणताही वहिवाटीचा रस्ता नाही. त्याकरिता त्यांनी गाव नकाशा दाखल केला आहे. असे असताना दि. १२.१२.२०२५ रोजीच्या आदेशानुसार आदेशाची अंमलबजावणी करता प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी प्रतिवादी क्र. २ कडे अर्ज दिला. त्यात या वादींनी आक्षेप घेतल्याने कारवाई झाली नाही. परंतु, प्रतिवादी यांनी अंमलबजावणी कामी दि. २४.०२.२०२६ ही तारीख निश्चीत केली. सदर प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असल्याबाबत या वादींची पोलीसांमार्फत चौकशी झाली. तसा जबाब लिहुन घेण्यात आला. तरीदेखील प्रतिवादी यांनी संगणमत करून वादीच्या जमीनीत अडीअडथळा करून रस्ता खुणा लावण्याचा प्रयत्न केला. सदर खुणा रोवुन रस्ता झाल्यास या वादींवर अन्याय होईल व दाव्यात अनेक गुंतागुंत निर्माण होईल. ज्याचे अपरिमित नुकसान या वादींना सोसावे लागेल. त्याकरिता त्यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ व २ यांना दाव्याचे समन्स लागुनही ते हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांचे म्हणणे प्राप्त करता आले नाही.

०४.	प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी सदर अर्जावर त्यांचे लेखी म्हणणे अर्जाच्या पाठीमागील बाजुस दिले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, या वादीने प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचा वहिवाट रस्ता अडवल्यामुळे मामलतदार अधिनियम कलम ५ अन्वये तहसिलदार यांच्याकडे त्यांनी अर्ज सादर केला. जो दि. ०९.१०.२०२५ रोजी मंजुर करण्यात आला. त्यानुसार दि. २४.०२.२०२६ रोजी संबंधीत अधिकारी व पोलीस बंदोबस्तासह आदेशाच्या अंमलबजावणीसाठी प्रतिवादी गेले असता वादी यांनी त्यांना अडीअडथळा निर्माण केला. सदर रस्ता हा प्रतिवादीच्या पुर्वापार वडीलोपार्जित वहिवाटीचा रस्ता असुन वादी यांनी तो बेकायदेशीररित्या अडवला आहे. तहसिलदार यांच्या आदेशाची अंमलबजावणी होउ नये म्हणुन तो लांबविण्याकरिता प्रस्तुतचा स्थगिती अर्ज दिला असल्याने तो फेटाळण्याची विनंती केली.

०५.	अर्ज, त्यावरील कथन व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. या बाबत वाद नाही की, प्रतिवादींनी दाखल केलेल्या कलम ५ मामलतदार अधिनियम अन्वये अर्जावर तहसीलदार यांनी दि. १२.१२.२०२५ रोजी आदेश पारित केला. सदर आदेशाप्रमाणे रस्ता खाली करून देणे बाबत त्यांनी सांगितले आहे. त्या अनुषंगाने त्याच्या अंमलबजावणीकामी प्रतिवादी क्र. १ व २ हे जायमोक्यावर पोलीस बंदोबस्तासह गेले असता पंचनामा दि. २४.०२.२०२६ रोजी या वादींनी त्यांना अडीअडथळा केला असे स्पष्ट होते. परंतु, सदर पंचनाम्याचे अवलोकन करता त्यामध्ये खुणा रोवण्यास प्रतिबंध केला असल्याचे नमुद केले आहे. खुणा या नव्याने रस्ता मोजमाप करून त्याची हद्द निश्चीत करण्याकामी केल्या जातात. जेव्हा की, तहसिलदार यांच्या आदेशाप्रमाणे केवळ रस्त्यात निर्माण केलेला अडीअडथळा दुर करावा असे तहसिलदारांचा आदेश आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी दाखल कागदपत्रांच्या अवलोकनार्थ असे स्पष्ट होते की, सदर आदेशाची अंमलबजावणी होत नसुन नव्याने रस्ता त्या ठिकाणी तयार करण्याच्या प्रयत्नात प्रतिवादी दिसुन येतात. त्यामुळे त्या ठिकाणी रस्ता अस्तित्वात आहे किंवा नाही हे केवळ गुणदोषावर सुनावणीअंती स्पष्ट होणार आहे. सदर आदेशाचा आधार घेउन जर नव्याने रस्ता निर्माण झाल्यास वादींचे अपरिमित नुकसान होउ शकते. अद्याप प्रतिवादी क्र. १ व २ हे प्रकरणात हजर झालेले नाही.

०६.	प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे दोन्ही बाजुच्या गुणदोषावर सुनावणी करणे मला आवश्यक वाटते. परंतु, जर सदर

आदेशाच्या आधारे वेगळीच कारवाई केली गेली तर वादीचा दावा दाखल करण्याचा हेतु असफल होईल. परिणामा अंती त्यांचे अपरिमित नुकसान होउ शकते. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्या अंतरिम मनाई हुकुमाचा अर्जावरती म्हणणे दाखल होउपावेतो वादीचा गट क्र. ४०४ मधील कथीत रस्त्याची परिस्थिती "जैसे थे'' ठेवण्याचा आदेश देणे योग्य होईल. सबब, अर्ज मंजुर करण्यास पात्र ठरतो. उपरोक्त सर्व चर्चेअंती खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी, प्रतिवादी यांनी वादी यांच्या गट क्र. ४०४ मधील प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचा अंतरिम मनाई हुकुमाच्या अर्जावर म्हणणे दाखल होईपर्यत परिस्थती "जैसे थे'' ठेवावी.

३. खर्च ज्याचा त्यांनी सोसावा.

स्वाक्षरीत/-

**( अदिती आर. नागोरी )**
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर.
जालना.

दिनांक :- ०२.०३.२०२६